**ई-लिलाव कार्यप्रणालीचा अवलंब करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**माहिती तंत्रज्ञान संचालनालय**
**शासन निर्णय क्रमांक : मातंसं ०८०/६/२०१३-DIR-DIT(MH)/३९**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०३ डिसेंबर, २०१४

**प्रस्तावना:**

शासकीय कामकाजात पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाच्या मिशन मोड प्रकल्पाचा भाग म्हणून ई-लिलाव प्रकल्प राज्यात प्रायोगिक तत्वावर काही जिल्ह्यांमध्ये यशस्वीपणे राबविण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत काही जिल्ह्यांमध्ये शासकीय जमिनींचे लिलाव, वाळु लिलाव, तेंदुपत्ता लिलाव इत्यादी एनआयसीच्या ई-लिलाव प्रणालीचा वापर करुन प्रायोगिक तत्वावर सुरु आहेत.

ई-लिलाव पद्धतीमुळे संपूर्ण लिलाव प्रक्रियेमध्ये पारदर्शकता येऊन शासकीय महसूलामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. ही बाब लक्षात घेऊन संपूर्ण राज्यामध्ये सर्वसमावेशकपणे ई-लिलाव कार्यप्रणाली सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

राज्यातील सर्व संसाधनांच्या लिलावामध्ये पारदर्शकता, सुटसुटीतपणा आणून व निकोप स्पर्धेला वाव देऊन शासकीय महसूलात वाढ व जास्तीत जास्त भौगोलिक क्षेत्रातील व्यापाऱ्यांपर्यंत पोचण्याच्या दृष्टिने ई-लिलाव प्रणालीचा वापर शासनाचे सर्व विभाग, सर्व कार्यालये, ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक उपक्रम आणि मंडळे (माहिती अधिकार कायदा अधिनियम २००५ मधील कलम ४ प्रमाणे) यांना दिनांक १ जानेवारी, २०१५ पासून बंधनकारक करण्यात येत आहे. सदर बंधन सध्या तरी रु.१,००,०००/- (एक लाख) किंवा त्यापेक्षा जास्त राखीव किंमतीच्या लिलावांसाठी लागू राहील.

ई-लिलाव पद्धतीचा अवलंब करण्यासाठी एनआयसी चेन्नईची ई-लिलाव आज्ञावली सध्या उपलब्ध आहे. सर्व विभागांनी सर्वसाधारणपणे एनआयसीच्या ई-लिलाव प्रणालीचा वापर प्राधान्याने करावा. पण एनआयसीची सदर ई-लिलाव आज्ञावली मोठ्या प्रमाणात वापरण्यासाठी उपयुक्ततेच्या दृष्टिकोनातून तपासाधीन आहे; म्हणून इतर आज्ञावलींचा वापर करण्याची मुभा सुद्धा राहील. मात्र अशा आज्ञावलींची निवड पारदर्शकपणे करणे आवश्यक राहील तसेच सदर आज्ञावली सुरक्षिततेच्या दृष्टिने प्रमाणित असणे आवश्यक आहे व त्या आज्ञावलींचा डाटा बॅकअप (Data Backup) ठेवण्याची जबाबदारी संबंधित विभागांची/संस्थांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४१२०३१४३६०७१४११ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Signature Not Verified

Digitally signed by RAJESH MADANLAL AGGARWAL
Date: 2014.12.03 16:42:14 IST
Reason:

**(राजेश अग्रवाल)**
प्रधान सचिव (मातं)

**प्रति,**

१) राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
४) सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५) प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
६) प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
७) सचिव, राज्य निवडणूक आयोग (पत्राने),
८) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
९) सचिव, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई (पत्राने),
१०) सचिव, महाराष्ट्र विधान परिषद, मुंबई (पत्राने),
११) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
१२) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा), मुंबई
१३) महालेखापाल, महाराष्ट्र-२ ( लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
१४) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा), नागपूर
१५) अधिदान व लेख अधिकारी, मुंबई,
१६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१७) मुख लेखा परीक्षक (निवासी लेखे), कोकण भवन, नवी मुंबई,
१८) सर्व विभागीय आयुक्त,
१९) सर्व जिल्हाधिकारी,
२०) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२१) सा.प्र.वि. कार्यासन-३९
२२) सर्व मंत्रालयीन विभाग,
२३) निरनिराळ्या मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.